दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.५ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २१९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 5 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 219 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणी मोठी अपडेट पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश

## पोलिस प्रशासनाच्या अडचणी वाढल्या






**मुंबई (वृत्तसंस्था)**–परभणी येथील संविधान शिल्प विटंबना प्रकरणी आंदोलन करणाऱ्या शहिद सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्या प्रकरणी उच्च न्यायालयात याचिकेवर सुनावणी सुरु आहे. या प्रकरणात आता पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.परभणी हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांचा १६ डिसेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीत असताना मृत्यू झाला होता. सुरुवातीला हा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, त्याच्या शवविच्छेदन अहवालात मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले होते. या प्रकरणात आता पोलिसांच्या अडचणी वाढल्या आहेत. परभणी हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या सोमनाथ सूर्यवंशीचा १६ डिसेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीत असताना मृत्यू झाला होता. सुरुवातीला हा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, त्याच्या शवविच्छेदन अहवालात मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले होते. तसेच सोमनाथचा मृत्यू मारहाणीत झाल्याचे न्याय दंडाधिकाऱ्यांच्या अहवालात म्हटले आहे. सोमनाथच्या मृत्यूला पोलिस जबाबदार असल्याचेही अहवालातून पुढे आले आहे. आता या प्रकरणाचा तपास सीआयडीकडून करण्यात येणार आहे. त्यामुळे या प्रकरणात आरोपींवर हत्येचा गुन्हा दाखल करण्याची शक्यता वर्तवली जात होतीच. सोमनाथ सूर्यवंशींच्या कुटुंबीयांनी न्यायाची मागणी करत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. यात कुटुंबीयांची बाजू वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर हे मांडत आहेत.परभणी हिंसाचार प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूने संपूर्ण राज्य हादरून गेले होते. सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांनी आरोप केला होता की, त्यांचा मृत्यू पोलिसांनी केलेल्या अमानुष मारहाणीमुळे झाला. प्राथमिक शवविच्छेदन अहवालात सोमनाथ सूर्यवंशी (३५) यांचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे उघड झाल्यानंतर, परभणीमध्ये एका पोलिस अधिकाऱ्यासह २ पोलिसांना निलंबित करण्यात आले होते. घटनेच्या सुमारे दोन महिन्यांनंतर ही कारवाई करण्यात आली होती.

# जिल्हा परिषद सोनीजवळा शाळेच्या विद्यार्थ्यांनी पटकावले पाच गोल्ड मेडल आणि सिल्व्हर मेडल

**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सोनिजवळा, शाळेतील इ .इयत्ता दुसरी ते सहावीच्या एकूण २५ विद्यार्थ्यांनी एमटीएस ओलंपियाड -२०२५ या राज्यस्तरीय परीक्षेत यावर्षी प्रथमच सहभाग घेतला होता . यापैकी पाच विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल तर पाच विद्यार्थ्यांनी सिल्वर मेडल मिळवून उत्तुंग यश प्राप्त केले आहे . तसेच उर्वरित पंधरा विद्यार्थीही उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत . या पदकविजेत्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आज शाळेत आयोजित करण्यात आला होता . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री . हनुमंत गायकवाड आणि प्रमुख अतिथी म्हणून समितीचे उपाध्यक्ष श्री .प्रवीण मस्के तसेच पीएसआय कु .स्वरूपा नाईकवाडे , दैनिक सामनाचे पत्रकार श्री.सुंदरराव नाईकवाडे




यांनी स्थान भूषविले . कार्यक्रमास सर्व शिक्षक , विद्यार्थी ,गावातील नागरिक आणि विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते .प्रथम अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . यानंतर मुख्याध्यापक श्री . गुंड सर यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावित केले . अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पाच गोल्ड मेडल आणि पाच सिल्वर मेडल सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले . तसेच परीक्षेत सहभागी विद्यार्थ्यांना उत्तीर्ण प्रमाणपत्र वितरत करण्यात आले . विशेष म्हणजे यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांबरोबरच त्यांच्या पालकांचाही शाल आणि पुष्प देऊन सन्मान करण्यात आला . कार्यक्रमात पीएसआय कु .स्वरूपा नाईकडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पेन आणि चॉकलेट भेट स्वरूपात दिले .कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री . सावंत सर यांनी तर आभार प्रदर्शन श्रीम. पवार मॅडम यांनी केले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीम .नवले मॅडम, गिरी मॅडम , श्री .काळे सर, सांगळे सर ,दौंड सर आणि जावळे सर , यांनी परिश्रम घेतले . विद्यार्थ्यांच्या या यशाचे सरपंच सौ. जान्हवीताई गोविंद ससाने, उपसरपंच स्वातीताई दादासाहेब कोकाटे , व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष आणि पत्रकार श्री . दशरथ चौरे यांनी कौतुक केले आहे .

# गंगा माऊली शुगरचा मिल रोलर पूजन कार्यक्रम संपन्न



**केज । प्रतिनिधी**

केज शहरालगत असलेला गंगा माऊली शुगर कारखान्याचे मिल रोलर पूजन चेअरमन लक्ष्मणराव मोरे,युवा नेते आदित्य पाटील, व्हाईस चेअरमन हनुमंत मोरे,भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, गंगा माऊली शुगरचे संचालक प्रवीण मोरे, संचालक अविनाश मोरे,काँग्रेसचे युवा नेते पशुपतीनाथ दांगट, आप्पासाहेब ईखे,प्रविणकुमार शेप,बाळासाहेब ठोंबरे,मुन्ना ठोंबरे,कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी आय मुजावर,मुख्य शेतकी अधिकारी अविनाश आदनाक आदींच्या हस्ते रोलर पूजन झाले. पुढील हंगाम गाळपासाठी पूजन कार्यक्रम घेऊन सुरुवात करण्यात आली. पुढील हंगामात साखर कारखाना गाळपाचा अधिकचा टप्पा पूर्ण करेल असे मत आदित्य पाटील यांनी बोलतांना व्यक्त केले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना विश्वास आणि हमीभाव याबाबाबत आम्ही शब्दबद्ध आहोत.कॅपिसिटी वाढवण्यासाठी गतीने प्रयत्न सुरू आहेत असे मत हनुमंत काका मोरे यांनी व्यक्त केले रोलर पूजन कार्यक्रमास परिसरातील नागरिक, कारखान्याचे कर्मचारी उपस्थित होते.

# घारगाव रस्त्याच्या दुरवस्थेमुळे शेतकर्यांची गाय गाळात अडकली

## आठ तासांनंतर सुटका गावकर्यांची

### घारगाव ते लिंबागणेश शिव रस्ताची तातडीने दुरुस्त करावा

**घारगाव । प्रतिनिधी**

मौजे घारगाव ते लिंबागणेश या शिव रस्त्याची दुरवस्था आणि दुरुस्ती अभावी शेतकर्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या निकृष्ट रस्त्यामुळे नुकतीच एक गंभीर घटना घडली आहे. शेतकरी भालचंद्र माणिकराव ढास यांच्या मालकीची गाय चिखलात अडकली आणि तब्बल आठ ते नऊ तास गाळात फसून राहिली.रस्ता खराब असल्यामुळे शेतात जाणे कठीण झाले असून, याच पार्श्वभूमीवर सदर घटना घडली. ढास दांपत्य आपल्या गायीसह शेतात गेले होते. रात्रीच्या वेळेस गाय अचानक चिखलात फसली. अंधारामुळे व रस्त्याच्या अडचणीमुळे कुणालाही कल्पना येऊ शकली नाही. शेतकरी आणि गाय घरी परत न आल्याने त्यांच्या घरच्यांनी शोध घेतला असता ही बाब उघड झाली. भालचंद्र ढास आणि त्यांच्या पत्नीने गायीला बाहेर काढण्याचा खूप प्रयत्न केला, मात्र गाळ घट्ट झाल्यामुळे त्यांना यश आले नाही. अखेर त्यांनी गावातल्या काही लोकांना मदतीसाठी बोलावले. गावकर्यांनी धाव घेत गायीची सुटका केली. गायीला गाळातून बाहेर काढण्यासाठी तब्बल आठ तास लागले. या सार्या घटनेने ढास कुटुंबाला मोठा मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागला. ही घटना ऐकून गावकर्यांनी संताप व्यक्त केला असून घारगाव ते लिंबागणेश रस्त्याच्या तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे.

गावकर्यांचे म्हणणे आहे हा रस्ता आमच्या शेतीसाठी अत्यावश्यक आहे. मात्र अनेक वर्षांपासून दुर्लक्षित आहे. पावसाळ्यात तर या रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट होते. जनावरं, शेतकरी आणि वाहनधारक सगळेच अडचणीत येतात. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. सदर घटना प्रशासनाला डोळे उघडणारी ठरावी अशी अपेक्षा गावकर्यांनी व्यक्त केली आहे.



**शेतकर्यास नुकसान भरपाई द्यावी**

**सदरील गाय गंभीर असून, ती शेवटच्या घटका मोजत आहे. यामुळे दुभती गाय मरणाच्या दारावर असल्याने शेतकर्याचे नुकसान झाले आहे. प्रशासनाने याचा पंचनामा करुन नुकसान भरपाई द्यावी अशी ग्रामस्थांची मागणी आहे.**
**भालचंद्र माणिकराव ढास**

# खा.बजरंग सोनवणेंच्या वाढदिवसानिमीत्त विद्यार्थ्यांची होणार आरोग्य तपासणी

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, जिल्हा शल्यचिकित्सक यांचे वैद्यकिय अधिक्षकांना पत्र

**बीड । प्रतिनिधी**

बीडचे खा.बजरंग सोनवणे यांचा वाढदिवस दि.६ जुलै रोजी जिल्हाभरात विविध कार्यक्रमांनी साजरा केला जात आहे. तालुकास्तरावर राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने रक्तदान शिबीरांचे आयोजन केले आहे. दरम्यान, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी ते बारावीपर्यंत विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे.खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्याबाबत डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रूग्णालय बीड यांनी सर्व वैद्यकिय अधिक्षकांना याबाबत पत्र दिले आहे.



राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करयात येते. यामध्ये ० ते ६ वर्षे वयोगटातील अंगणवाडीमध्ये जाणाऱ्या बालकांची वर्षातून २ वेळा तर शासकीय आणि निमशासकीय शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करण्यात येते. दरम्यान, दि.६ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमीत्त संपूर्ण बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरावर विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीने वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाशी संपर्क करण्यात येत असून संबंधीत शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत जनजागृती करावी, असेही डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय, यांनी म्हटले आहे. दरम्यान, यासाठी तालुकास्तरावर नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. वैद्यकिय अधिक्षक, सर्व जिल्हा/ उप जिल्हा/ ग्रामिण रुग्णालय, यांना पत्र पाठवून आपल्या अधिनस्त आरबीएसके अंतर्गत सर्व वैद्यकिय पथकांना सज्ज ठेवून आरोग्य तपासणी करावी, असे आदेश दिले आहेत.

### या कार्यक्रमांचाही समावेश

**केज शहर: उपजिल्हा रुग्णालय, केज येथे रुग्णांना साडी वाटप, फळ वाटप, बालाजी मंदिर येथे आरती, दर्गा येथे चादर अर्पण करणे,वयोवृद्ध आश्रम येथे किट वाटप, शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, शेतकरी महिलांचा सन्मान असे विविध कार्यक्रम. रक्तदान शिबीर: येडेश्वरी कारखाना आनंदगाव सा, आष्टी, पाटोदा, अंबाजोगाई, घाटनांदूर, धारूर, वाघोली,सिरसाळा. इतर सामाजिक उपक्रम: बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात शालेय साहित्य वाटप, फळ वाटप, वृक्षा रोपण, फराळीचा कार्यक्रम होणार.**

**वंचित बहुजन आघाडीचे बीड शहर अध्यक्ष लखन काका जोगदंड यांच्या वाढदिवसा निमित्त सत्कार करताना, पत्रकार बालाजी जगतकर, संतोष जोगदंड, श्यामसुंदर जाधव, अरविंद इनकर, मिलिंद सरपते, योगेश गायकवाड, ओंकार सावंत आदी दिसत आहेत.**



## संपादकीय..

# शस्त्रास्त्र उत्पादकांना युद्धांमुळे लाभले बळ

जगातील मंदीसदृश स्थितीचा फटका शस्त्रास्त्र उत्पादकांना बसला आहे. जागतिक बाजारात शस्त्रास्त्र उत्पादकांची उलाढाल कमी झाली होती. गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन–रशिया, इराण–इस्त्रायल आणि गाझापट्टीमध्ये संघर्ष पेटूनही शस्त्रास्त्र उत्पादनांची मागणी वाढत नव्हती. अशा स्थितीमध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये सुरू झालेल्या युद्धामुळे जागतिक शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या..शस्त्रास्त्रांच्या बाजारपेठेत बरेच बदल झाले आहेत. संरक्षणशस्त्रांचे उत्पादन करणाऱ्या देशांमधील कंपन्या दलालांना हाताशी धरून आपली निर्यात वाढवत असतात. अमेरिका आणि रशिया हे शस्त्रास्त्र उत्पादनातील आणि निर्यातीतील मोठे खेळाडू होते. भारतासह अनेक देश त्यांच्याकडून शस्त्रे खरेदी करतात. अलीकडच्या काही वर्षांमध्ये भारताने 'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून शस्त्रास्त्रांच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर भर दिला आहे. भारताने केवळ स्वयंपूर्णतेचे उद्दिष्ट ठेवलेले नाही, तर तो आता निर्यातीच्या मार्गावर निघाला आहे. जगातील अनेक देशांना भारत शस्त्रास्त्रे पुरवायला लागला आहे. ही निर्यात २५ हजार कोटी रुपयांपर्यंत गेली आहे. दुसरीकडे, युरोपमधूनही शस्त्रास्त्रांची मागणी कमी झाली आहे. शस्त्रास्त्रांच्या बाजारपेठांमध्ये काहीशी मंदी असल्याने उत्पादक चिंतेत होते. गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन–रशिया युद्ध, इराण–इस्त्रायल संघर्ष, गाझा पट्टीतील लढा सुरू असूनही शस्त्रास्त्र उत्पादनांची मागणी वाढत नव्हती. जागतिक शस्त्रास्त्र बाजारपेठेत अजूनही अमेरिका अव्वल आहे; परंतु रशियाचा वाटा मात्र घटला आहे. असे असले, तरी भारत–पाकिस्तान युद्धात रशियाची संरक्षण सामग्री ही चीन आणि अमेरिकेच्या सामग्रीपेक्षा उजवी असल्याचे सिद्ध झाले. त्याचा परिणाम आगामी शस्त्रास्त्र विक्रीवर होऊ शकतो. 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या अहवालानुसार, युरोपीय 'नाटो' सदस्य अमेरिकेने पुरवलेल्या शस्त्रास्त्रांवर अवलंबित्व वाढवत आहेत. या पार्श्वभूमीवर शस्त्रास्त्रांच्या जागतिक बाजारपेठेतला सूर दखलपात्र आहे.

२०१५–१९ आणि २०२०–२४ दरम्यान युरोपीय 'नाटो' सदस्यांकडून शस्त्रास्त्रांची दुप्पट आयात झाली. अमेरिकेने या शस्त्रास्त्रांपैकी ६४ टक्के पुरवठा केला, जो २०१५–१९ च्या तुलनेत (५२ टक्के) लक्षणीयरीत्या जास्त आहे. फ्रान्स आणि दक्षिण कोरिया (प्रत्येकी ६.५ टक्के), जर्मनी (४.७ टक्के) आणि इस्रायल (३.९ टक्के) हे इतर मुख्य पुरवठादार होते. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात रशियाच्या वाढत्या आक्रमक भूमिकेमुळे आणि ट्रान्सअटलांटिक संबंधांमधील तणावामुळे युरोपीयन 'नाटो' देशांनी शस्त्रास्त्र आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि युरोपीयन शस्त्रास्त्र उद्योगाला बळकटी देण्यासाठी पावले उचलली. युरोपीय 'नाटो' देशांनी अमेरिकेकडून सुमारे ५०० लढाऊ विमाने आणि इतर अनेक शस्त्रे ऑर्डर केली आहेत. गेल्या काही काळात अमेरिकेने शस्त्रास्त्र निर्यातीत आपला वाटा वाढवला, तर रशियन निर्यातीत घट झाली. २०१५–१९ आणि २०२०–२४ दरम्यान अमेरिकेची शस्त्रास्त्र निर्यात ३५ टक्क्यांवरून ४३ टक्क्यांपर्यंत वाढली. २०२०–२४ मध्ये अमेरिकेने १०७ देशांना प्रमुख शस्त्रे पुरवली.

गेल्या दोन दशकांमध्ये २०२०–२४ मध्ये पहिल्यांदाच अमेरिकेच्या शस्त्रास्त्र निर्यातीचा सर्वात मोठा वाटा मध्य पूर्वेला (३३ टक्के) न देता युरोपला (३५ टक्के) गेला. तरीही सौदी अरेबिया अमेरिकन शस्त्रास्त्रांचा सर्वात मोठा आयातदार राहिला. (अमेरिकेच्या शस्त्रास्त्र निर्यातीच्या बारा टक्के). लढाऊ विमानांसारख्या प्रगत लांब पल्ल्याच्या हल्ल्याच्या क्षमतांसाठी अमेरिका हा पसंतीचा पुरवठादार आहे. अमेरिकेच्या तुलनेत, २०१५–१९ आणि २०२०–२४ दरम्यान रशियन शस्त्रास्त्रनिर्यातीत झपाट्याने घट झाली. फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर पूर्ण आक्रमण करण्यापूर्वी ही घसरण सुरू झाली. युक्रेनविरुद्धच्या युद्धामुळे रशियाच्या शस्त्रास्त्र निर्यातीतली घट आणखी वाढली.२०१५–१९ आणि २०२०–२४ दरम्यान फ्रान्सने इतर युरोपीय देशांना केलेल्या प्रमुख शस्त्रास्त्रांच्या निर्यातीत जवळजवळ तिप्पट वाढ झाली. हे प्रामुख्याने ग्रीस आणि क्रोएशियाला लढाऊ विमानांचा पुरवठा आणि २०२२ मध्ये रशियाच्या पूर्ण आक्रमणानंतर युक्रेनला शस्त्रास्त्रांचा पुरवठा यामुळे घडले. युरोपियन देशांना फ्रान्समधून १५ टक्के शस्त्रास्त्रे निर्यात झाली. फ्रान्सकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे मिळवणारा कतार हा दुसरा सर्वात मोठा देश होता. २०२०–२४ मध्ये चीन हा शस्त्रास्त्रांचा चौथा सर्वात मोठा निर्यातदार होता. जागतिक शस्त्रास्त्र निर्यातीत त्याचा वाटा ५.९ टक्के होता. चीन शस्त्रास्त्र निर्यात वाढवण्याचे प्रयत्न करत असूनही अनेक मोठे आयातदार राजकीय कारणांमुळे चिनी शस्त्रे खरेदी करत नाहीत. आशिया आणि ओशनिया हे शस्त्रास्त्र आयात करणारे सर्वात मोठे प्रदेश आहेत. २०१५–१९ आणि २०२०–२४ दरम्यान आशिया आणि ओशनियातील देशांमध्ये जाणाऱ्या जागतिक शस्त्रास्त्र हस्तांतरणाचा वाटा ४१ टक्क्यांवरून ३३ टक्क्यांपर्यंत घसरला. या प्रदेशातील आयातीत २१ टक्के घट ही मुख्यतः दोन कालावधीत चीनच्या शस्त्रास्त्र आयातीत ६४ टक्के घट झाल्यामुळे झाली. कारण त्यांनी प्रामुख्याने रशियाकडून होणाऱ्या आयातीऐवजी स्थानिक पातळीवर डिझाइन केलेल्या आणि उत्पादित शस्त्रास्त्र प्रणालींवर भिस्त ठेवली. आज चीनच्या देशांतर्गत शस्त्रास्त्र उद्योगाची क्षमता वाढत असताना त्याची शस्त्रास्त्र आयात कमी होत राहण्याची अपेक्षा आहे.

जागतिक स्तरावर शस्त्रास्त्रांच्या दहा सर्वांत मोठ्या आयातदारांमध्ये आशिया आणि ओशनियामधील चार देशांचा समावेश आहे. ते म्हणजे भारत, पाकिस्तान, जपान आणि ऑस्ट्रेलिया. १९९०–९४ नंतर पहिल्यांदाच चीन पहिल्या दहा शस्त्रास्त्र आयातदार देशांमधून बाहेर पडला. २०२०–२४ मध्ये अमेरिका या प्रदेशासाठी मुख्य पुरवठादार होता. त्यांचा प्रादेशिक शस्त्रास्त्र आयातीत ३७ टक्के वाटा होता. रशिया (१७ टक्के) आणि चीन (१४ टक्के) असा वाटा होता. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र आयातदार होता. त्याच्या आयातीला चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांकडून असणाऱ्या धोक्यांचा संदर्भ होता. तथापि, २०१५–१९ ते २०२०–२४ दरम्यान त्याची आयात ९.३ टक्क्यांनी कमी झाली. भारतीय शस्त्रास्त्र आयातीपैकी सर्वात मोठा वाटा (३६ टक्के) रशियाकडून आला, जो २०१५–१९ (५५ टक्के) आणि २०१०–१४ (७२ टक्के) पेक्षा खूपच कमी आहे. २०१५–१९ आणि २०२०–२४ दरम्यान पाकिस्तानकडून शस्त्रास्त्र आयात ६१ टक्क्यांनी वाढली. दरम्यान, पुरवठादार म्हणून चीन आणखी प्रबळ झाला. २०२०–२४ मध्ये पाकिस्तानच्या शस्त्रास्त्र आयातीपैकी ८१ टक्के वाटा चीनचा होता, जो २०१५–१९ मध्ये ७४ टक्क्यांवरून वाढला आहे. २०१५–१९ आणि २०२०–२४ दरम्यान पूर्व आशियाई देशांकडून शस्त्रास्त्र आयात २२ टक्क्यांनी कमी झाली, चीनकडून शस्त्रास्त्र आयातीत मोठी घट झाली आणि तैवान (– २७ टक्के) आणि दक्षिण कोरिया (– २४ टक्के) यांच्या आयातीत लक्षणीय

घट झाली.शस्त्रास्त्रांच्या आयातीमध्ये वाढ करणारा जपान (+९३ टक्के) हा एकमेव पूर्व आशियाई देश होता. युरोप आणि मध्य पूर्वेला शस्त्रास्त्रांची आयात माध्यमांचे लक्ष वेधून घेत असताना आशिया आणि ओशनिया हे २०२०–२४ मध्ये जगातील सर्वात मोठे शस्त्रास्त्र आयात करणारे क्षेत्र राहिले. या प्रदेशातील बहुतेक शस्त्रास्त्र खरेदीमागे चीनशी संबंधित धोक्याची धारणा आहे. मध्य पूर्वेला होणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या आयातीपैकी अर्ध्याहून अधिक आयात अमेरिकेतून (५२ टक्के) झाली तर १३ टक्के इटलीतून, ९.८ टक्के फ्रान्समधून आणि ७.६ टक्के जर्मनीतून झाली. प्रादेशिक संघर्ष आणि तणाव मध्य पूर्वेमध्ये शस्त्रास्त्रांच्या आयातीची मागणी वाढवत आहेत. असुरक्षित युद्ध आणि संघर्षांमुळे पश्चिम आफ्रिकेमध्ये शस्त्रास्त्रांची आयात झपाट्याने वाढली आहे. गेल्या १५ वर्षांमध्ये सुरक्षा परिस्थिती बिघडल्यामुळे पश्चिम आफ्रिकेत शस्त्रास्त्रांचे हस्तांतरण झपाट्याने वाढले आहे. आता भारत आणि पाकिस्तानमधील युद्धाच्या परिस्थितीत जागतिक शस्त्रास्त्र पुरवठादार कंपन्यांना चांगले दिवस येण्याचे स्वप्न पडायला लागले आहे.

# वाढत्या तोट्यावर बस भाडेवाढीचा उतारा

गेले अनेक आठवडे या स्तंभात बेस्टवरील वाढता तोटा व त्याची कारणे यांचा ऊहापोह होत असतानाच वाढत्या तोट्यावर उतारा म्हणून अखेर बेस्टने बस प्रवाशांवर भाडेवाढ लादलीच. ही भाडेवाढ जशी अपरिहार्य होती तसेच बेस्टला या भाडेवाढीमुळे थोडेफार सावरायला तरी मिळेल. मात्र भाडेवाड हा अखेरचा उपाय नव्हता. बऱ्याच गोष्टींवर बेस्टने नियंत्रण मिळवले असते वेळीच उपाययोजना केली असती, तर ही बेस्ट बस भाडेवाढ टळली असती. मात्र गेल्या आठवड्यात मुख्यमंत्र्यांकडे झालेल्या बैठकीत बेस्टने बस भाडेवाढीची मागणी केली होती तसा प्रस्तावही दिला होता. मुंबई महानगरपालिकेने कोणताही विचार न करता भाडेवाडीस मान्यता दिली. आता राज्य वाहतूक नियमकाकडून परवानगी मिळाल्यानंतर येत्या एक दोन दिवसात ही बस भाडेवाढ लागूही होईल. तसे पाहायला गेले तरी दरवाढ अटळ होती व कधी ना कधी होणारच होती. याने बेस्टला थोडेफार सावरता येईलही मात्र कायमस्वरूपी उभे राहता येणार नाही हे ही खरे. मात्र ही भाडेवाढ पाहिल्यास दुप्पट असून, सध्याच्या तिकिटापेक्षा ७० ते ८० टक्के जास्त आहे. मात्र याच्या परिणामांचाही फेरविचार करण्याची गरज येणाऱ्या काळात करावी लागेल. सध्या वातानुकुलीत बसचे असलेले भाडे सहा रुपयांवरून थेट १२ रुपये म्हणजे दुप्पट होणार आहे तर साध्या बसचे भाडे पाच रुपयाचे १० रुपये होणार आहे. वातानुकूलित बसचे भाडे १३ रुपयावरून थेट वीस रुपये होणार असून साध्या बसेस पंधरा रुपयावरून वीस रुपये होईल. मात्र सध्या साध्या बस गाड्यांची संख्या खूपच मर्यादित असल्याने व वातानुकूलित बस गाड्यांची संख्या जास्त असल्याकारणाने वातानुकूलित बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा फटका बसणार आहे. याच दरात इतकेच काय तर याच्या पेक्षाही कमी दरात शेअर रिक्षा शेअर टॅक्सीचा पर्याय उपलब्ध झाल्यास बेस्टचे बस प्रवासी मोठ्या प्रमाणात कमी होतील. आतापर्यंत स्वस्त दरात बस सेवा मिळत होती तिथे प्रवासी रांग लावून बस प्रवास करत होता. तिथे तो आता आपसुकच शेअर टॅक्सी व शेयर रिक्षाला रांग लावेल. मुंबईत लवकरच काही मेट्रो मार्ग सुरू होत आहेत, त्याचा ही फटका बेस्टला बसेल. सध्या बस गाड्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमतरता असल्याने वेळेवर न येणाऱ्या बस गाड्या हे पाहून स्वतःची खाजगी वाहने विकत घेणाऱ्यांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढेल व मुंबईत पुन्हा वाहतूककोंडी सारखी स्थिती दिसली तर नवल वाटणार नाही. वास्तविक पाहता त्याकाळी बस भाडेवाढ कमी करण्याचा मुंबई महानगरपालिकेचा उद्देशच लोकांनी आपल्या स्वतःच्या गाड्या घरी ठेवाव्यात व सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करावा हा होता. मात्र पालिकेचा उद्देश हा असफल ठरला असून बेस्ट दर कमी केल्याने बेस्ट मात्र तोट्याच्या खड्ड्यात नकळतपणे अडकली मग याची जबाबदारी कोण घेणार हे आता ठरवण्याची वेळ दिली आहे. बेस्टला आर्थिक गरतेतून बाहेर काढण्यासाठी तिकिटांची दरवाढ करणे अपरिहार्य आहे. सध्या बेस्टचा बस ताफा हा २७००वर आला असून भाडेतत्त्वावरील बस गाड्यांची संख्या सध्या मोठी आहे. बेस्टने उत्पन्न वाढीसाठी मिडी बस, मिनी बस गाड्या, टेम्पो अशा नवीन प्रकाराच्या बस गाड्या भाडेतत्त्वावर घेतल्या. कंत्राटांमधील काही गोष्टी बेस्ट ने गांभीर्याने न घेतल्याने कर्मचारी वर्ग न टिकल्याने तीन कंत्राटदारांनी अचानक बेस्ट मधून काढता पाय घेतला. त्यामुळे भाडेतत्त्वावरील बस गाड्यांवर अवलंबून असलेल्या बेस्टला मोठा झटका बसला व बस सेवा ठप्प झाल्या. अचानक झालेल्या या बस कपातीमुळे बेस्ट पासून प्रवासी वर्ग दुरावला व ४३ लाख असलेली प्रवाशांची संख्या थेट ३४ लाखांवर घसरली त्यात आता सध्याच्या बस गाड्या भंगारात निघाल्याने व कंत्राटदाराच्या मोठ्या बस वेळेत न आल्याने बेस्टची संख्या दिवसेंदिवस कमी होत गेली आणि प्रवाशांनी मग भलेही स्वस्त बस प्रवास असला तरी बेस्ट प्रवासाला रामराम ठोकला. सध्याच्या होणाऱ्या बस भाडेवाडीमध्ये वातानुकूलित बसचे भाडे हे १३ रुपये २० रुपये ३० रुपये ४० रुपये असे आहेत. त्यात कंत्राटदारांनी बस गाड्यांची देखभाल न केल्याने बंद पडलेली वातानुकूलित यंत्रणा ही प्रवाशांसाठी सध्या मोठी डोकेदुखी बनली आहे.




महापालिकेने यंदा ७४,४२७ हजार कोटींचा अर्थसंकल्प सादर केला त्यात बेस्टला मात्र वार्षिक तोटा फक्त १५०० कोटी आहे, तो जर पालिका प्रशासनाने दिला असता तर बेस्ट भाडे वाढ ही नक्कीच टळली असती. मात्र हे देखील खरे आहे की आता बेस्टला फक्त कंत्राटदारांचे खिसे भरण्यासाठी ही दरवाढ करायची आहे. कारण ज्या प्रमाणात बेस्टच्या कंत्राटदारांच्या बस सेवा बेस्ट उपक्रमात दाखल होत आहे त्यामुळे बेस्टचा दैनंदिन खर्चही वाढत चालला आहे. गेली तीन ते चार वर्ष बेस्टकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले आहे. या दरवाढीने बेस्टचे असलेले उत्पन्न ८४५कोटी आहे. मात्र बस भाडेवाढीनंतर ते १४०० कोटी होईल. मात्र या ६०० कोटींसाठी ३४ लाख मुंबईकर प्रवाशांना वेठीस धरले जाणार आहे. त्यामुळेही जर बेस्ट बस दरवाढ झाली आणि काही महिन्यात मुंबई महापालिकेच्या निवडणुका आल्या, तर मात्र या दरवाढीचा परिणाम त्या निकालावर काही प्रमाणात तरी लागू शकेल यात शंका नाही!

# अवकाळीने रानमेवा रानातच!

एप्रिल–मे महिना म्हणजे कोकणात चाकरमान्यांची लगबग... मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आदी शहरांमध्ये नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने जे बाहेर असतात असे सारे कोकणात आपल्या मूळ गावी येतात. या चाकरमान्यांच्या आगमनाने कोकणातील गावखेडी गजबजलेली असतात. कोकणातील बंद घरे चाकरमान्यांच्या वास्तव्याने महिनाभरासाठी उघडी दिसतात. तशी गावातील वाडी–वस्तीतही लोकांची ये–जा सुरू असते. एप्रिल–मे महिना लग्न सोहळे, गावातील ग्रामदेवतांचे वर्धापन दिन, गावचे उत्सव, कोकणातील ग्रामदेवतांच्या मंदिरातील महाप्रसाद असं सारं उत्सवी वातावरण असतं. कडक उन्हाळ्यातही ग्रामदेवतेच्या उत्सवात प्रत्येक गावकरी आपल्या कुटुंबासह सहभागी असतो. कडक उन्हाळा, काही गावातून जाणवणारी पाणीटंचाई असं सगळं वातावरण असलं तरीही कोकणवासीय मात्र आपला आनंद मित्रपरिवार, नातेवाईक यांच्या विवाह सोहळ्यात, वास्तुशांतीच्या कार्यक्रमातून शोधत असतो. त्यात कोकण रमलेलं असतं. आंबा, काजू, कोकम, करवंद, जांभुळ कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांच्या स्वागतास तयार असतात; परंतु यावर्षी आंबा, काजू यांच पीक कमी झालं. काजू 'बी' चा दर सर्वसाधारणपणे स्थिर राहिला; परंतु हवामानाच्या सततच्या परिणामाने पिकावर आणि उत्पादित झालेल्या काजू 'बी'वर त्याचा परिणाम झाला.



काजू 'बी'वर काळपट थर जमा झाला. साहजिकच काजू बागायतदार शेतकऱ्यांची मेहनत वाढली. काजू 'बी' साफसफाई केल्याशिवाय विक्रीला देता येणारी नव्हती. आंब्याची स्थिती यापेक्षा वेगळी नव्हती. सुरुवातीला हापूस आंब्याचा दर चांगला होता; परंतु बदलत राहणारे हवामान आणि अवकाळी पाऊस यामुळे साहजिकच आंबा शेवटच्या टप्प्यात आंबा बागायतदार शेतकऱ्याच्या हातून निसटला. एकतर यावर्षी आंबा उत्पादनही फारच कमी प्रमाणात झाले. कोकणातील स्थानिक बाजारपेठातून कोकणातील हापूस आंबा गायब झाला आहे. कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्याकडे आंबाच नाही. त्यामुळे बाजारपेठामध्ये कोकणाबाहेरचा आंबा विक्रीला दिसत आहे. कोकणात भरणारा आठवडा बाजार आणि गावठी बाजारात कोकणातील झाडी आंबा येऊ लागला आहे. मात्र, कोकणात रायवळ आंब्याची जुनी झाडही गावातून दुर्मीळ होत आहेत. यामुळे कोकणात पूर्वी गोरगरीब कुटुंबांना मे महिन्यात आधार वाटणारा रायवळ आंबा दिसेनासा झाला आहे. पूर्वीची आंब्याची झाड जपली जात नाहीत आणि नव्याने कोणीही रायवळ आंब्याची लागवडही करत नाही. यामुळे साहजिकच कोकणच वैशिष्ट्यपूर्ण असलेला रायवळ आंबा अस्तित्वहीन होत चालला आहे.

कोकम हे कोकणच आणखी एक खास वैशिष्ट्य आहे. कोकमची सोलकढी आज अगदी महाराष्ट्रातच नव्हे तर जगाच्या बाजारपेठेतही मानाने जेवणाच्या ताटात मिरवताना दिसते. कोकमला यावर्षी दरही चांगला होता; परंतु कोकमच उत्पादनही कमी आहे. कोकमला मेहनत आहे. आता कोकणात इतकी मेहनत करून कोकणातील या कोकमच विविध प्रकार करण्यात पुरेस मनुष्यबळही उरलेले नाही. दुसरी गोष्ट कोकणात कोकम लागवड ज्याला फार कमी मेहनत असते. ती कोकम लागवड व्हायला हवी होती. परंतु ती लागवड म्हणावी त्या प्रमाणात झाली नाही. कोकम लागवड मोठ्या प्रमाणात कोकणात झाली असती तर त्याचा फायदाही कोकणातील शेतकऱ्याला होऊ शकला असता. परंतु यातही काही भागात मात्र शेतकऱ्यांनी कोकमची स्वतंत्र बागायत केल्याचे सकारात्मक दृश्यही पाहायला मिळतं. याचं प्रमाण फार कमी असलं तरीही कोकणातील काही मोजक्या शेतकऱ्यांनी प्रायोगिकतेत प्रयत्न तर केले आहेत. जांभुळ यावर्षीही कोकणच्या बाजारात फार कुठे दिसले नाही.

कोकणातील जांभुळ पुणे, मुंबईच्या बाजारात पाठवले जाते. त्याला मागणीही मोठ्या प्रमाणात आहे; परंतु जांभुळ लागवडीच्या बाबतीतही कोकणात उदासीनताच पाहायला मिळते. जांभुळ लागवड करून त्याचा बागायत म्हणून आजवर कोणी फारसा विचार केलेला नाही. दुसरी बाब जांभुळ, करवंद याबाबतीत कोकणकृषी विद्यापीठ आजही उदासीनच आहे. यामुळेच जांभुळ, करवंदांकडे कृषी विद्यापीठाने त्याकडे आपलं लक्ष वळवलेलं नाही. कोकणची काळी मैना म्हणून या करवंदांचा उल्लेख सर्वत्र होतो. कोकणातील ही करवंद डोंगर–दऱ्यांमध्ये असतात. रानात दिसणारी ही करवंद पूर्वी बाजारात विक्रीला यायची. कोकणात येणारा चाकरमानीही शेताच्या बांधावर काटेरी झुडपात होणारी करवंद सहकुटुंब या करवंदाचा आस्वाद घ्यायचा, चांदवड्याच्या पानाचा तयार केलेला खोला. त्यात आपण स्वत: करवंदांच्या झाळीवरून काढलेली करवंद ती खाण्यात एक वेगळीच मजा असते. हा आनंद ज्यांनी अनुभवला असेल निश्चितच नुसत्या कल्पनेनेही त्यांना ते जुने दिवस आठवल्यावाचून राहणार नाहीत. यावर्षी या अशा सर्व आनंदावर विरजणच पडले आहे. कोकणात पाऊस सुरू झाला. सुरुवातीला हा पाऊस एकच दिवस वाटला; परंतु तसे घडले नाही. तो रोज संध्याकाळी, सकाळीही पाऊस पडू लागला. यामुळे साहजिकच कोकणातील रानमेवा लोकांपर्यंत पोहोचण्यापूर्वी रानातच राहिला. यामुळे जशी जांभुळ, करवंद लोकांना त्याची फारशी चव चाखायलाही मिळाली नाही. यामुळे यावर्षी अवकाळी पावसाने कोकणात उत्पादित होणाऱ्या सर्वच फळांच्या बाबतीत काहीशी अशीच स्थिती आहे. फणसाचं उत्पादन यावर्षी चांगलं झालंय. यामुळे कोकणातील मुंबई–गोवा महामार्गावर कोकणातील फणस विक्रीला असलेला दिसतो. कापे आणि रसाळ या दोन प्रकारात असणाऱ्या फणसांना दोन्ही प्रकारात फार मोठी मागणी आहे. मात्र, यातही कापा फणस बाजारात फार मोठ्या प्रमाणात विक्रीला असतो. याचं एक सहज आठवलेलं उदाहरणही सांगतो. सिंधुदुर्गात २००९ मध्ये राज्य मंत्रिमंडळाची बैठक होती. या राज्य मंत्रिमंडळ बैठकीला सर्व मंत्रीगण उपस्थित होते. त्यावेळच्या मंत्रिमंडळ बैठकीसाठी राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजितदादा पवार उपस्थित होते. तेव्हा अजितदादा पवार राज्याचे अर्थमंत्री होते. त्यावेळच्या जेवणामध्ये स्वीट डीश म्हणून कापे गरे होते. अजितदादांनी कापे गऱ्याची तेव्हा खास फर्माइश केली. अगदी कापे गरे पॅकिंगमधूनच मागितले होते. त्यामुळे कोकणातील या काप्या गऱ्यांची स्वादिष्टताही वेगळीच आहे. कोकणातील हे सारं निसर्ग निर्मित फळ यावर्षी पावसाने मात्र त्याचा स्वाद तर बिघडलाच; परंतु लोकांपर्यंत येण्यापूर्वीच रानातच राहिला.

# खोके-बोक्यांचा आरोप करणाऱ्यांनीच खोके घेवून मंत्रीपदे बहाल केली-खा.संदिपान भुमरे

## केवळ ऑनलाईन दिसणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या विरोधात उठाव केला म्हणूनच जनतेला न्याय देता आला!

**नेवासा । प्रतिनिधी**

आमचे पहीले मुख्यमंत्री केवळ ऑनलाईन दिसत होते त्यामुळे आम्हाला उठाव करावा लागला आमच्यावर खोके - बोकेंचा आरोपही झाला आम्ही मात्र शिवसेनेशी प्रामाणिक राहून हातात झेंडे धरले केसेस अंगावर घेतल्या आणि सत्ता आल्यावर आम्हाला चांगले मंत्री पद देण्यापेक्षा खोके बहाद्दरांना दिले गेले अशी खोचक टिका छत्रपती संभाजीनगरचे शिवसेनेचे खासदार संदिपान भुमरे यांनी उबाठा सेनेचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर शिरसगांव (ता.नेवासा) येथे करत चांगलाच हल्लाबोल केला. यावेळी बोलतांना ते म्हणाले की,त्यावेळचे ऑनलाईन दिसणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी कधी आमच्याशी बोललेच नाही त्यामुळे आम्हाला हा उठाव करवा लागला आणि आमचा उठाव हा जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सत्कारणी लागला असल्याचे खासदार संदिपान भुमरे यांनी यावेळी सांगून मला मिळालेल्या मंत्रीपदाचे सोने करत शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय दिल्याचे आत्मिक समाधान लाभल्याचे गौरोद्गार खासदार संदिपान भुमरे यांनी शिरसगांव (ता.नेवासा) येथे बुधवार (दि.२) रोजी नेवासा विधानसभा मतदार संघाचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या आयोजित अभिष्ठचिंतन सोहळ्याप्रसंगी बोलतांना केले.यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार डॉ.सुजय विखे - पाटील,माजी आमदार



पांडूरंग अभंग,पंचगंगा उद्योग समुहाचे सर्वेसर्वा प्रभाकर (काका) शिंदे,काशिनाथ नवले, सिद्धांत नवले - पाटील,राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार,किसनराव गडाख,भाजपाचे नेते सचिन देसरडा, ऋषीकेश शेटे,दत्तु नाना पोटे,हरिभाऊ लंघे,डॉ.तेजेश्री लंघे,शंकरराव लोखंडे,शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश डिके,अंकुशराव काळे,राजेंद्र पोटे, अशोकराव मिसाळ,सुनिलराव वाघमारे,ज्ञानेश्वर पेचे, त्रिमुर्ती शैक्षणिक संकुलाच्या उपाध्यक्ष ॲड.स्नेहल चव्हाण - घाडगेपाटील,दादा विधाटे प्रताप चिंधे,भाऊसाहेब वाघ यांच्यासह विविध सामाजिक,धार्मिक आणि राजकिय क्षेत्रातील विविध मान्यवर यावेळी व्यासपिठावर प्रभृती उपस्थित होते.यावेळी बोलतांना खासदार संदिपान भुमरे पुढे म्हणाले की,माझ्या सारख्या सर्वसामान्य मानसाला शिवसेनेचे सर्वेसर्वा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठे केले असून आमदार विठ्ठलराव लंघे - पाटील यांच्या मागे तर विखे कुटूंबियांची भक्कम साथ असल्यामुळे त्यांना लवकरच लाल दिवाही मिळू शकतो? असा आशावाद आमदार विठ्ठलराव लंघे - पाटील यांच्या अभिष्ठचिंतन सोहळ्यीप्रसंगी खासदार भुमरे यांनी व्यक्त केल्यामुळे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात मोठी दाद दिली.यावेळी बोलतांना डॉ.सुजय विखे - पाटील म्हणाले की, आमदार विठ्ठलराव लंघे - पाटील यांना वेळोवेळी मोठी राजकीय संधी आलेली असतांनाही त्यांनी 'ती' सोडून दिल्यामुळे दुसऱ्यांनीच या संधीचा लाभ उठवत या तालुक्याचे आमदार झाले या विधानसभा निवडणूकीमध्ये आमदार विठ्ठलराव लंघे - पाटलांना मिळालेल्या संधीत या निवडणूकीत काहींनी मदत करण्यापेक्षा त्यांना पाडण्यासाठी सुपारी घेवून रिंगणात उतरले ? अशी टिका अप्रत्यक्षपणे माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांच्यावर केली मात्र सर्वसामान्य जनतेने विठ्ठलराव लंघे - पाटील यांना आमदार केल्याचे डॉ.सुजय विखे - पाटील यांनी सांगून ते पुढे म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरचे शिवसेनेचे खासदार संदिपान भुमरे आणि नेवाशाचे आमदार विठ्ठलराव लंघे - पाटील हे असे दोन उदाहरणे राज्यात आहेत की,सर्वसामान्य माणूसही आमदार - खासदार होवू शकतो? असे सांगून डॉ.सुजय विखे - पाटील म्हणाले की,आमदार विठ्ठलराव लंघे सारखा माणूस राज्यात शोधूनही सापडणार नाही सर्वसामान्य जनतेशी त्यांची नाळ जोडलेली असून ४५ वर्षानंतर आपल्या गावातील आपल्या आमदाराचा सत्कार करण्याचा योग थेट ४० वर्षानंतरच्या अविष्मरणीय राजकीय प्रवासातून शिरसगांवकरांना आल्यामुळे या अभिष्ठचिंतन सोहळ्याला विशेष महत्व असल्याचे गौरोद्गारही यावेळी डॉ.सुजय विखे - पाटील यांनी यावेळी बोलतांना केले.यावेळी सत्काराला उत्तर देतांना आमदार विठ्ठलराव लंघे - पाटील बोलतांना म्हणाले की,माझ्या स्वभावात कधीही बदल होणार नाही,सर्वसामान्य जनतेने आणि माझ्या लाडक्या बहिनींमुळे मला ही संधी मिळालेली असून या संधीचे 'मी' सोने करुन जनसामान्यांच्या प्रश्नासाठी सदैव तत्पर राहील,अशी ग्वाही यावेळी आमदार लंघे - पाटील यांनी देत ते पुढे म्हणाले की, 'मी'तुमच्या सारखाच सर्वसामान्य माणूस असून तुम्ही मला कधीही भेटू शकता, पहील्या आमदारांना भेटण्यासाठी सात पडदे ओलांडून जावे लागत होते आता मला भेटण्यासाठी अशी गरज भासणार नाही मला आपण कुठेही भेटू शकता असे सांगून ते म्हणाले की,शैनेश्वर देवस्थानचा ॲप घोटाळ्याबाबत आपण विधानसभेत आवाज उठविणार असून घोटाळेबाज लोकांसह मास्टरमाईंडचे काळे बुरखे फाडणार असल्याची रोखठोक भूमिकाही यावेळी त्यांनी स्पष्ट केली या अभिष्ठचिंतन सोहळयाप्रसंगी तालुक्यातील महायुतीचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुधवारी सकाळी १० वाजता नेवासा येथील शिवसेनेच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन राज्याचे माजी मंत्री छत्रपती संभाजीनगरचे शिवसेनेचे खासदार संदिपान भुमरे आणि माजी खासदार डॉ.सुजय विखे - पाटील यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर शिरसगांव येथील अभिष्ठचिंतन सोहळा पार पडला.

# मराठवाडा शिक्षक संघाकडून कालिदास धपाटे यांचा सन्मान

**बीड (प्रतिनिधी):** अन्यायग्रस्त शिक्षकांचा पाठीराखा, मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे ३० जून रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले त्यानिमित्त मराठवाडा शिक्षक संघाकडून त्यांचा सन्मान करण्यात आला.



यशवंत विद्यालयात संपन्न झालेल्या कालिदास धपाटे यांच्या सेवापुर्ती समारंभाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ शिक्षक नेते तथा संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष उत्तमराव सानप होते. प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम, जेष्ठ कामगार नेते कॉम्रेड नामदेव चव्हाण, संघटनेचे मार्गदर्शक डी. जी. तांदळे, मुख्याध्यापक संघाचे विभागिय सचिव जे. एम. पैठणे, बामुक्टोचे विभागिय सचिव प्रा. डॉ. मारोती तेगमपुरे, प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने, मराठवाडा शिक्षक संघाचे विभागीय उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, राज्य सरकारी मध्यवर्ती संघटना तथा समन्वय समितीचे अध्यक्ष बाबा बडे, यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश वाघ यांची उपस्थिती होती.

जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळातील सदोतीस वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर कालिदास धपाटे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. या काळात एक विद्यार्थी-प्रिय विज्ञान शिक्षक, सर्वांना सोबत घेऊन चालणारा मुख्याध्यापक म्हणून त्यांनी आपली छाप पाडलीच परंतु त्यासोबतच भयमुक्त शिक्षक, भ्रष्टाचारमुक्त गुणात्मक शिक्षण! कर्तव्याचे अनुपालन व हक्कासाठी संघर्ष! हे ब्रीद घेऊन काम करणाऱ्या मराठवाडा शिक्षक संघाशी जोडले गेले. अन्यायग्रस्त शिक्षकाच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका त्यांनी घेतली. मराठवाडा शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष म्हणून काम केल्या नंतर जिल्हाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली. कालिदास धपाटे यांचा सेवापुर्ती समारंभ शि चळवळीतील कार्यकर्त्यांची चिंतनसभाच झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक डी. जी. तांदळे यांनी केले. कामगार नेते कॉम्रेड नामदेव चव्हाण, प्रा डॉ. पुरूषोत्तम जुन्ने, संघटनेचे उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे यांचीही समयोचित भाषणे झाली. अध्यक्षीय समारोपात उत्तमराव सानप यांनी मराठवाडा शिक्षक संघाचा गौरवशाली इतिहास उपस्थितां समोर उभा केला. सत्कारास उत्तर देताना कालिदास धपाटे सद्गदित झाले. शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपण शिक्षक व शिक्षणासाठी लढत राहू असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन प्रगतिशील कवी पंजाबराव येडे यांनी केले तर आभार मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हा सचिव गणेश आजबे यांनी मानले. कार्यक्रमास मराठवाडा शिक्षक संघाचे कार्याध्यक्ष नागनाथ तोंडारे, कोषाध्यक्ष नामदेव काळे, प्राचार्य युवराज मुरूमकर, मुख्याध्यापक बन्सी हावळे, नदीम सर, पुरूषोत्तम येडे पाटील, शारेख बेग, काद्री परवेझ, घोडके, ढोलताशे, रमाकांत शेळके, मधुकर चौरे यांच्यासह मोठ्या संख्येत उपस्थिती होती.

# वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुपचा स्तुत्य उपक्रम




**केज (प्रतिनिधी) :**पर्यावरण संरक्षण काळाची गरज आहे.बदलत्या वातावरणाचा पर्यावरणावर होत असलेला विपरीत परिणाम लक्षात घेता एक वृक्ष लावुन जन्मदिवस साजरा करुया पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करुया. ही संकल्पना घेऊन व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुप, धनेगावच्या वतीने व्हॉलीबॉल प्रेमी सत्तार शेख यांच्या वाढदिवसानिमित्त धनेगाव कॅम्प येथील व्हॉलीबॉल मैदान परिसरात वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

सद्य परिस्थितीत मोबाईल मध्ये गुंतलेली तरुण पिढी आणि त्यामुळे मैदानी खेळ मोबाईलच्या युगात लोप पावत असताना मात्र धनेगाव कॅम्प व परिसरातील तरुणांनी एकत्र येत व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुप ची स्थापना केली आहे.दैनंदिन हे तरुण मैदानावर एकत्र येत व्हॉलीबॉल खेळाचा आनंद घेत असतात.त्यातील व्हॉलीबॉल प्रेमी सत्तार शेख यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रुपच्या वतीने वृक्षारोपण करून आगळा वेगळा वाढदिवस साजरा केला आहे.यावेळी रवींद्र नवले,धनंजय गुजर,सिद्धार्थ पोटभरे,सत्तार शेख,सुनील गुजर,अमोल गोरे,सुजय पकवे, सुहास गुजर,गणेश शिंपले,नबी सय्यद,अजय वाघमारे,बालाजी सिरसाट,कैलास गुजर सिद्धेश्वर गुजर,ओम आंबुरे यांच्यासह व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

# एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुर्वीच्याच ठिकाणी थांबा द्या-समाजवादी पार्टी

**अंबाजोगाई (प्रतिनिधी) -**अंबाजोगाई शहरात एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुर्वीच्याच ठिकाणी थांबा द्या, तसेच पोस्ट ऑफिस मध्ये नागरिकांची वाढती गर्दी पहाता कर्मचारी व काऊंटर यांची संख्या वाढवावी अशी मागणी समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ॲड.शिवाजी कांबळे, शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी अंबाजोगाई शहर ठाण्याचे पोलिस निरीक्षक व पोस्ट मास्टर यांना दिलेल्या दोन स्वतंत्र निवेदनातून केली आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी सांगितले की, पोलिस निरीक्षक यांना दिलेल्या पहिल्या निवेदनात नमूद केले आहे की, समाजवादी पार्टी, अंबाजोगाई यांच्या वतीने उपजिल्हाधिकारी तसेच एस.टी.आगारप्रमुख यांना यापूर्वी निवेदन देण्यात आलेले आहे. तरी एस.टी डेपो मॅनेजरने सांगितले की, याबाबत आपण पोलीस स्टेशनला ही कळवा. म्हणून आज रोजी आम्ही आपणांस निवेदन देत आहोत. विषय असा की, पोलिस प्रशासनाने अंबाजोगाई शहरातील जिल्हा परिषद शाळेसमोर जागा उपलब्ध करून दिल्यास आम्ही एस.टी तिथे थांबवू, पुर्वी एस.टी बसेस या छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील जिल्हा परिषद शाळेसमोर थांबत होत्या. तेथेच प्रवासी बसेस मधून उतरत असत. सध्याच्या थांबामुळे रहदारी व वाहतूकीस मोठा अडथळा निर्माण होतो आहे. कारण, मोंढा रोडपासून ट्राफिक जाम होतो. मोंढा येथे दर मंगळवारी बाजार भरतो. तसेच या परिसरातच न्यायालयाकडे व स्वाराती रूग्णालयाकडे जाणारा रस्ता आहे. आणि आद्यकवी मुकुंदराज समाधी परिसराकडे जाणारा रस्ता व श्री योगेश्वरी देवी मंदीराला जाणारा रस्ता ही आहे. मोंढ्याकडून आणि स्वातंत्र्यवीर सावरकर



चौकाकडून दोन्ही साईडची ट्राफीक छत्रपती शिवाजी महाराज चौक नजीक मध्यभागी एसटी बसेस थांबत असल्यामुळे जाम होते. त्यामुळे एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुर्वीच्याच ठिकाणी थांबा द्यावा.अंबाजोगाई येथील पोस्ट कार्यालयात फार पुर्वीपासून जेवढे कांऊटर आहेत. आज सुध्दा तेवढेच कांऊटर व कर्मचारी आहेत. वाढते शहरीकरण आणि नागरिकीकरण पहाता तसेच दिवसेंदिवस पोस्टाच्या विविध सुविधांचा लाभ घेणाऱ्या नागरिकांची संख्या ही वाढत आहे. मुलभूत सुविधा तात्काळ मिळत नाहीत. यासाठी ग्राहक तसेच जेष्ठ नागरिक यांना पोस्ट ऑफिस मध्ये गर्दीमुळे ताटकळत थांबावे लागते. बँक व्यवहारासाठी तसेच रजिस्टर पोस्ट आणि विविध कामांसाठी कांऊटर कमी असल्यामुळे खूप वेळ वाया जातो. तरी पोस्टमास्टर यांनी वरीष्ठांना याबाबत त्वरित कळवावे आणि अंबाजोगाई पोस्ट ऑफिस कार्यालयात कांऊटरची संख्या व कर्मचारी वाढविण्यात यावेत. तसे न झाल्यास अंबाजोगाई पोस्ट ऑफिससमोर अंदोलन करण्यात येईल याची संपुर्ण जबाबादारी पोस्ट मास्टर यांच्यावर राहील. असा इशारा सदरील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ॲड.शिवाजी कांबळे, अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी, शहर उपाध्यक्ष शेख शाकेर यांच्या स्वाक्षर्या आहेत.

# आषाढी एकादशी निमित्त नाथ फाऊंडेशनच्या वतीने रक्तदान शिबिर

**बीड (प्रतिनिधी)-**आषाढी एकादशी निमित्त बीड तालुक्यातील पोखरी (मैंदा) येथे आषाढी एकादशी निमित्त भाविकांची अलोट गर्दी असते प्रती वर्षी प्रमाणेच नाथ फाऊंडेशन च्या वतीने मागील सात वर्षांपासून येथे आषाढी एकादशीला रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते.रक्त दात्यानां नाथ फाऊंडेशन कडून एक फोन करताच सुविधा उपलब्ध होत असल्याने या रक्तदान शिबीरात शेकडो रक्तदान होते . आषाढी एकादशी निमित्त नाथ फाऊंडेशन च्या रक्तदान शिबीरात जास्तीत जास्ती रक्तदान करण्याचे आवाहन अध्यक्ष संतोषकुमार तापडिया सह नाथ फाऊंडेशन सदस्यांच्या वतीने करण्यात येत आहे. नाथ फाऊंडेशन घाटसावळी हि सामाजिक संस्था मागिल सात वर्षांपासून आरोग्य, शिक्षण व वृक्षारोपण यांवर कामं करत असुन या संस्थेने जिल्हा परिषद शाळेतील दहा हजार विद्यार्थ्यांना स्कुलबॅग,पाणी बॅटल सह शैक्षणिक साहित्य पुरवण्याचा प्रयत्न केला आहे तसेच वृक्षारोपण केलं आहे.सामाजिक घटकातील अती सामान्य माणसाला रक्त मिळावं म्हणून रक्तदान शिबिराचे मागिल सात वर्षांपासून आयोजन करण्यात येत आहे या रक्तदान शिबीरातून रक्त देणार्या रक्तदात्याच्या एका फोन वर पेशेंट जेथे आहे तेथे रक्त पुरवण्याचे कामं नाथ फाऊंडेशन करत असल्याने नाथ फाऊंडेशन च्या रक्तदान शिबिरांत शेकडो रक्तदाते रक्तदान करतात आषाढी एकादशी निमित्त थोरले विठ्ठल रखुमाई मंदिर पोखरी येथे नाथ फाऊंडेशन च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या रक्तदान शिबीरात शेकडो रक्तदात्यांनी सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष संतोषकुमार तापडिया, डॉ दिनकर बोंगाणे, धनंजय गुंदेकर, सतिश लांडे, अशोक चव्हाण, प्रल्हाद बादाडे, गोकर्ण करांडे यांनी केले आहे.

# आवरगावकर विधी महाविद्यालयात वसंतराव नाईक जयंती साजरी

**बीड (प्रतिनिधी)-**प्रख्यात कृषीतज्ञ, प्रगतशील शेतकरी, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक काळ विराजमान राहत महाराष्ट्राला शेती क्षेत्रात यशस्वीरित्या अग्रेसर स्थानी आणण्याकरता सातत्याने प्रयत्नशील राहिलेल्या, वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ,स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयामध्ये त्यांना अभिवादन करण्यात आले.



यावेळी वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष, माजी आमदार राजेंद्र जगताप म्हणाले की, भारताचे माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांची केंद्रात संरक्षण मंत्रीपदी निवड झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची जबाबदारी ज्यांना दिली गेली त्या वसंतराव नाईक यांनी त्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्राला शेती क्षेत्रात अभूतपूर्व अशी प्रगती साध्य करण्याकरता अहोरात्र प्रयत्न केले. कृषीसंस्कृतीचे पुनरूत्थान करीत वसंतराव नाईकांनी देशभरात नावलौकिक मिळविला. आधुनिक भारतीय शेती आणि शेतकऱ्यांचा त्यांनी मान उंचाविला. 'आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत' या शब्दात प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत एकनाथराव पवार यांनी वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे, ते नक्कीच सार्थ आहे. इ.स. १९७२ मधील महाराष्ट्रातील भीषण दुष्काळादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांसाठी मदतीच्या दूरगामी योजना राबवल्या.या अभिवादन प्रसंगी माजी आमदार जनार्दन तुपे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शाहिस्ता इनामदार, सर्व प्राध्यापक आणि विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यात काँग्रेसकडून नविन तालुका अध्यक्षांच्या निवडी जाहीर

## जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनाही प्रभारी वरून कायम अध्यक्ष

## आगामी निवडणुकात काँग्रेस ताकतीने लढण्याचा निर्धार

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने सर्वच तालुका अध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून बीड जिल्हा काँग्रेसने आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तयारी सुरू केली असल्याचे यावेळी सांगितले. या नियुक्त्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा. रजनीताई पाटील यांच्या सूचनेवरून व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोक पाटील, आदित्य पाटील, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे, पशुपतीनाथ दांगट, प्रवीनकुमार शेप, गणेश राऊत आदींच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले.केज तालुका अध्यक्ष पदी श्री. प्रविण लक्ष्मण खोडसे,बीड ग्रामीणश्री. गणेश आसाराम बजगुडे, परळी वैजनाथ ग्रामीण,ॲड. प्रकाश बापूराव मुंडे,परळी वैजनाथ शहर,श्री. हानिफ करीम सय्यद,अंबेजोगाई ग्रामीण श्री.अभिजीत व्यंकटराव लोमटे,आष्टी श्री. फारोक मोहम्मद सय्यद, पाटोदा श्री. राहुल शाहुराव जाधव, माजलगांव श्री. नारायण लक्ष्मण होके पाटील, धारूर श्री. सिध्देश्वर देवराव रणदिवे, गेवराई श्री. महेश गणेश बेद्रे, अंबाजोगाई शहर श्री. मोहमद असिफोद्दीन सइदोद्दीन खतीब बीड शहर श्री. परवेज अहमद बशिरोद्दीन कुरेशी, शिरूर कासार भास्कर बुवासाहेब केदार, माजलगाव शहर अफरोज मुसा तांबोळी, वडवणी ज्ञानेश्वर आबासाहेब आंधळे याप्रमाणे निवडी जाहीर करून नियुक्तीपत्र देण्यात आले.

राज्यात काही दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याने आता प्रत्येक पक्ष बांधणी करत असल्याचे दिसत आहे. काँग्रेसने देखील जिह्यात सर्वच तालुका अध्यक्षांच्या व काही ठिकाणी शहर अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.



काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.सौ. रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणारा प्रत्येक कार्यकर्ता हा एकनिष्ठ व पक्षाच्या विचारधारेचा आहे. आमच्यावर दिलेली जबाबदारी आम्ही चोखपणे पार पाडू व काँग्रेसला जिल्ह्यात पुन्हा चांगले दिवस आणू अस मत यावेळी सर्वच तालुका अध्यक्ष यांनी बोलताना व्यक्त केले. यावेळी माजी मंत्री अशोक पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांना शुभेच्छा देऊन पदाचा वापर पक्ष वाढवण्यासाठी व पक्षाची भूमिका सर्वसामान्य जनतेला समजावून सांगा आजही प्रत्येक गावातील मोठा वर्ग काँग्रेस विचाराचा आहे. आपण त्या लोकांशी संपर्क करा आणि संघटन वाढवा, सर्वसामान्य जनतेच्या कामाला, वेळेला उभे रहा लोकांचा विश्वास आपल्यावर आहे आपण मोठ्या ताकतीने काम करा व आगामी नगर पालिका, नगर परिषदा, तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती मध्ये आपल्याला उतरायचं आहे त्या अनुषंगाने कामाला लागण्याच्या सूचना देखील यावेळी माजी मंत्री अशोक पाटील यांनी दिल्या. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी देखील सर्व तालुका अध्यक्षांना आप आपली मरगळ झटकून मोठ्या ताकतीने येणाऱ्या निवडणुका लढवण्यासाठी कामाला लागण्याचे आदेश दिले तसेच पक्ष संघटनाच्या बाबतीत काहीही अडचण असेल तर आम्हाला कळवा प्रत्येक कामात जिल्हाध्यक्ष तुमच्या सोबत राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमाला जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# पत्रकार दिनकर शिंदे यांचे ज्येष्ठ बंधू नंदकुमार शिंदे यांचे दु:खद निधन



**गेवराई । प्रातिनिधी**

पत्रकार दिनकर शिंदे यांचे ज्येष्ठ बंधू नंदकुमार शिंदे वय ५२ वर्षे यांचे पुणे येथील डी वाय पाटील हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन. त्यांच्या पश्चात पत्नी सरोज, मुलगा रोशन यांच्यासह वडील सेवानिवृत्त मुख्याध्यापक टी डी शिंदे, आई शकुंतला, भाऊ डॉक्टर दीपक शिंदे, पत्रकार दिनकर शिंदे, बहीण अनिता आदी परिवार आहे.दिनांक ५ जुलै २२५ रोजी सकाळी १० वाजता सिद्धेश्वर स्मशानभूमी गेवराई येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थी परिषदेची निवडणूक संपन्न

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):**अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल येथील विद्यार्थ्यांची विद्यार्थी परिषद -२०२५ ची निवडणूक लोकशाही पद्धतीने व अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाली. या निवडणुकीत इयत्ता १० वी च्या वर्गातील हेड बॉय पदासाठी हर्षराज देशमुख आणि शिवेंद्रसिंह कणसे यांच्यात चुरशीची लढत झाली. तसेच हेड गर्ल पदासाठी कु. आरोही पवार, कु. ज्ञानेश्वरी ढगे, कु. इशिका कांबळे, कु. तनिष्का दामा व कु. मारिया काझी या विद्यार्थिनींनी उमेदवारी अर्ज भरून निवडणूक लढवली.

क्रीडा मंडळ, सांस्कृतिक मंडळ, शिस्तमंडळ , तसेच शाळेतील रेड, ब्लू, येलो व ग्रीनया चार ग्रहांच्या प्रमुख आणि उपप्रमुख पदासाठी मतदान घेण्यात आले. या निवडणुकीसाठी एकूण ६३




विद्यार्थ्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. या मतदानात इयत्ता ६ वी ते १० वीचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मतदार म्हणून मतदानाचा हक्क बजावला. यावेळी सर्व वर्गांचे वर्गशिक्षक बूथ प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळत होते. मतदान केंद्र निरीक्षक म्हणून जयशंकर त्रिपाठी यांनी भूमिका पार पाडली, तर निवडणूक अधिकारी म्हणून प्रिन्सी डी कार्यरत होते. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे आयुक्त म्हणून शाळेचे प्राचार्य एम. प्रशांतकुमार यांनी मार्गदर्शन केले.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांची, जबाबदारीची आणि नेतृत्वगुणांचा अनुभव शिकण्यास मिळाला. संस्था वेळोवेळी अशा प्रकारच्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करत असते. शाळेतील या आगळ्या वेगळ्या उपक्रमाने विद्यार्थ्यांमधे लोकशाहीची मूल्ये रुजवण्यात मदत झाली. विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रियेची पारदर्शक माहिती झाली . या उपकमासाठी संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी , कार्यकारी संचालक संकेत मोदी , मार्गदर्शक चव्हाण सर ,प्रा डी एच थोरात , मार्गदर्शक बी.आय. खडकभावी यांनी सहभागी विद्यार्थी (उमेदवार , मतदार ) यांचे कौतुक करून शुभेच्छा व्यक्त केल्या.

# संपूर्ण ग्रामविकास हेच वसंतराव नाईक यांचे स्वप्न-डॉ.हनुमंत सौदागर

**केज (प्रतिनिधी)**-महाराष्ट्रा मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात वसलेला असून जोपर्यंत गावचा विकास होणार नाही तोपर्यंत महाराष्ट्र विकसित होणार नाही. म्हणूनच संपूर्ण ग्रामविकास हे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री जलनायक वसंतराव नाईक यांचे स्वप्न असल्याचे प्रतिपादन डॉ. हनुमंत सौदागर यांनी केले. ते भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय केज येथे वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावर बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य विजय शिनगारे, डॉ. नागेश कराळे, ग्रंथपाल अशोक घोडके, श्रीकांत लुंगारे, श्री.सुजित नाईकवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी



उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी डॉ. कराळे पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्राच्या कृषीचा अत्यंत सखोल अभ्यास असणारे आणि त्या दृष्टीने जलसंधारणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारे कृतीशील सुधारक म्हणजे वसंतराव नाईक हे असल्याचे सांगितले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थी उपस्थित होते.

# पवनचक्कीच्या मनमानी कारभार विरोधात सरकारने दखल घ्यावी-श्रीधर बाबा भवर

**कळंब (प्रतिनिधी)**-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे कळंब तालुकाध्यक्ष प्रा.श्रीधर (बाबा) भवर यांच्या सुचनेनुसार मा.जिल्हाधिकारी साहेब धाराशिव यांच्या द्वारा मा.उपविभागीय अधिकारी कळंब यांना मौजे तांदुळवाडी ता.वाशी जि.धाराशिव येथील शेतकरी वाशी तहसील कार्यालयासमोर पवनचक्की कंपनी च्या मनमानी कारभाराच्या विरोधात आमरण उपोषणाला बसले आहेत. याची तात्काळ दखल घेऊन मुजोर पवनचक्की कंपनी आणि कंपनीच्या दलालांवर कठोर कारवाई करावी तसेच दिशाभुल करुन तुटपुंजी रक्कम देऊन शेतकऱ्यांना दमदाटी चालू आहे ती तातडीने थांबली पाहिजे आणि शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा योग्य तो मोबदला लवकरात लवकर देण्यात यावा.शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य न केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात



येईल असा इशारा दिला.या आशयाचे निवेदन देण्यात आले.याप्रसंगी भिमा हगारे, विठ्ठल कोकाटे, अतुल धुमाळ, आफताब तांबोळी,अतिष वाघमारे, स्वप्निल चिलवंत तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉक्टर्स डे निमित्त २६ जणांचे रक्तदान रोटरी क्लब व आय.एम.ए.चा उपक्रम

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**-डॉक्टर्स डे च्या निमित्ताने इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात २६ जणांचे रक्तदान करण्यात आले. येथील इंडियन मेडिकल असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी,वसुंधरा सेवा प्रतिष्ठान,जीवनदाई ब्लड बँक,भुतडा हॉस्पिटल यांच्या वतीने डॉक्टर्स डे चे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा,डॉ.राजेश इंगोले,परमेश्वर गित्ते,आय.एम.ए.चे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे,सचिव डॉ.उद्धव शिंदे,रोटरीच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी,डॉ.अनिल भुतडा, डॉ. मनिषा



भुतडा,विनोद पोखरकर,डॉ.सचिन पोतदार,यांच्या उपस्थितीत करण्यात आले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे.या माध्यमातून समाजाशी रक्ताने नाते जोडण्याची किमया साध्य होते.असे मुंदडा यावेळी बोलताना म्हणाले. यावेळी डॉ.इंगोले,गित्ते, यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी डॉ.नवनाथ घुगे यांनी या रक्तदान शिबिराच्या आयोजनाची भूमिका सांगून आय.एम.ए. करीत असलेल्या कामांची माहिती दिली. यावेळी झालेल्या रक्तदान शिबिरात २६ जणांनी रक्तदान केले.या प्रसंगी डॉ.एन.पी.देशपांडे, डॉ.ज्योती देशपांडे, डॉ.शुभदा लोहिया, डॉ.प्रल्हाद गुरव, डॉ.दीपक लामतुरे, डॉ.अतुल शिंदे, डॉ. अरुणा केंद्रे, डॉ.मनिषा पवार संगीता नावंदर, डॉ.प्रसाद कुलकर्णी, डॉ.विनोद जोशी, रोटरी क्लबचे कल्याण काळे, धनराज सोळंकी, रमेश देशमुख, भीमाशंकर शिंदे, बालाजी घाडगे, जगदीश जाजू,मंदाकिनी गित्ते,यांची उपस्थिती होती.

# कळंब मध्ये पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा व ज्येष्ठ पत्रकारांचा गौरव सोहळा संपन्न




**कळंब (प्रतिनिधी)**-पत्रकारांच्या कल्याणासाठी झगडत असलेल्या व्हॉइस ऑफ मीडिया कळंब तालुक्याच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा व ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. सत्कार समारंभात पत्रकारांच्या पाल्यांना एकुण ३० कीटचे वाटप करुन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संजय पाटील दुधगावकर जि प माजी अध्यक्ष धाराशिव, हे होते, कार्यक्रमाचे उद्घाटक संजय पवार पोलीस उपविभागीय अधिकारी कळंब, व नायब तहसीलदार भराडीया हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ.रश्मी मारवाडी महिला विंग प्रदेशाध्यक्ष, व्हॉइस ऑफ मीडिया, उमेश पोतदार कृषी विभाग कळंब, केतनजी कात्रे शैक्षणिक विंग महाराष्ट्र राज्य, अमर चोंदे कार्यवाहक महाराष्ट्र राज्य, व अशोक शिंदे अध्यक्ष कळंब तालुका पत्रकार संघ प्रामुख्याने यांची उपस्थिती होती. त्यावेळेस जमलेल्या पत्रकार बांधवांना पोलीस उपविभागीय अधिकारी संजय पवार, संजय पाटील दुधगावकर माजी जि प अध्यक्ष, रश्मी मारवाडी महिला लिंग प्रदेश अध्यक्ष, आणि चेतन कात्रे या सर्वांनी मार्गदर्शन केले, यावेळेस सौ.संगीता वनकळस यांची महिला विंग जिल्हाध्यक्ष धाराशिव पदी निवड करण्यात आली. या कार्यक्रमाला व्हॉइस ऑफ मीडियाचे सदस्य, पत्रकार बांधव, भगिनी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोशी महाराज मोहेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन पत्रकार, सुधाकर रणदिवे यांनी केले. हा कार्यक्रम पंचायत समिती सभागृह येथे घेण्यात आला होता.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077